# महाराष्ट्रासाठी सांस्कृतिक धोरण

— अरुण टिकेकर

रोहन प्रकाशन यांनी जानेवारी २०११ मध्ये प्रकाशित केलेल्या 'पॉवर पेन अ‍ॅन्ड पॅट्रनेज मिडिया, कल्चर अ‍ॅन्ड द मराठी सोसायटी'मधून लेखकाच्या परवानगीने पुनर्मुद्रीत केला.

एक भाकित आहे की, मुंबईमध्ये एकविसाव्या शतकात संपत्तीचा न भूतो न भविष्यति असा ओघ वाहणार आहे; असे झाले तर प्रश्न उभा राहतो की, नजिकच्या भविष्यकाळात या महानगराला जी भूमिका बजावायची आहे त्यासाठी, केवळ भौगोलिक जागा, इमारतींच्या आभाळाला भिडणाऱ्या रेषा आणि सुविधांमधील जडणघडण यांची पुरर्रचना पुरेशी ठरेल का? आपल्यामध्ये असे कित्येकजण आहेत की ज्यांना वाटते, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात या शहराने देशाला जे विचारशील आणि सांस्कृतिक नेतृत्व दिले ते त्याचे स्थान आता हरपले आहे. अगदी १९७० च्या काळाने मुंबईतील नाटके, संगीत, साहित्य इत्यादींमध्ये जी भरभराट पाहिली त्याच्याशी तुलना करता एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात निश्चितपणे सांस्कृतिक घसरण सुरू झाली आहे. ब्रिज नारायण यांनी संघटित केलेली सूरसिंगार संसदेचे, संस्कृत नाट्यमहोत्सवाचे (१९७०मध्ये तब्बल १६ नाटकांचे प्रयोग झाले.) किंवा इप्टातर्फे (इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशन) केल्या जाणाऱ्या नाटकांचे प्रयोग यांचे दिवस मागे सरले. अगदी कामगार चळवळी आणि त्यांच्या नेत्यांनी केलेली विचारप्रवृत्त भाषणे हीसुद्धा ऐकू येईनाशी झाली. अर्थात आजही अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात, मुंबई फेस्टिव्हल (सोहळा), काळा घोडा फेस्टिव्हल आयोजित केली जाताहेत. कलेचे दालन संपन्न आहे, अधिक चित्रपटांची निर्मिती होते आहे, आणि त्यातून सुसंस्कृत (सिविल) समाजाला रसरशीतपणा प्राप्त होतो आहे. परंतु अनेक चर्चासत्रे आणि वादविवाद निष्फळ होताहेत आणि त्यात तोच तो पणा येतो आहे. कल्पनांना कृतीत उतरविता येईल अशी शक्ती त्यातून निष्पन्न होत नाही आणि हे वादविवाद-ही चर्चासत्रे १९ व्या शतकात द्यायची त्याप्रमाणे खाजगी-सार्वजनिक सहभागाला (प्रायव्हेट-पब्लिक पार्टनरशिप, पीपीपी) उत्तेजनाही देऊ शकत नाहीत. आपण नवीन कल्पनांची निर्मिती करतो आहोत का, शहराची वैचारिक संस्कृती संपन्न करण्यासाठी आपण काही करतो आहोत का या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची आज गरज आहे. आज मुंबई विचारशक्तीचा ऱ्हास (डिइन्टेलेक्च्युअलायझेशन) झालेल्या अवस्थेत असल्यासारखे वाटते आहे. यासाठी उदाहरण द्यावयाचे तर/सामाजिक विज्ञान किंवा मानव्यशास्त्रे यांमध्ये आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावर खूप मोठे काम करणारी ख्यातकीर्त विचारवंत व्यक्ती आज विद्यापीठामध्ये आढळत नाही. याउलट, काहीच वर्षांपूर्वी असे अनेक व्यासंगी लोक होते. विचारशक्तीचा ऱ्हास झालेल्या आजच्या मुंबईला आणखी एका समस्येला तोंड द्यावे लागते ती म्हणजे, वारेमाप खर्च करून या शहराचे रंगरूप पालटून टाकण्यासाठी केले जाणारे प्रयत्न. इतिहासाने दिलेला एक महत्त्वाचा धडा असा आहे की जो समाज चिंतनशील नाही, भौतिक वृद्धीबरोबर सांस्कृतिक विकासाला प्रोत्साहन देत नाही तो जीवनाच्या सर्व

क्षेत्रांत रसातळाला जातो. आणि अर्थातच वैचारिक प्रगती सांस्कृतिक प्रगतीच्या आधी येते. असे म्हटले जाते की सांस्कृतिक घसरण सुरू झाली की कला बहरते. लेखक आणि कलाकार शांतपणे भ्रष्ट पद्धतीच्या विरुद्ध त्यांच्या कलेच्या माध्यमातून उभे ठाकतात आणि सांस्कृतिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. मुंबईच्या बाबतीत सांस्कृतिक घसरण झाली आहे परंतु सिद्धान्ताचा दुसरा भाग अजून सुरू व्हायचा आहे. यासाठीची कारणे असंख्य असली तरी त्यांचा मागोवा घेणे फारसे कठीण नाही. यातील प्रमुख कारण आहे विचारशील प्रयत्नांची आवड नसल्यामुळे शहराची सातत्याने होणारी सांस्कृतिक पडझड.

समाजाची विचारशक्तीसंपन्नता(इंटेलेक्चुअलायझेशन) या शब्दप्रयोगामध्ये मला काय म्हणायचे आहे ते मला स्पष्ट केले पाहिजे. विचारशक्तीसंपन्नता या संकल्पनेमध्ये तर्काची जोपासना, तो अंगी बाणवणे आणि त्याच्याशी अतूट नाते असणे; विवेकनिष्ठा आणि विज्ञानाच्या विकासासकट प्रगत कल्पना यांचा समावेश होतो. कोणत्याही विचारशील समाजामध्ये वैविध्यपूर्ण आणि प्रगल्भ सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम असणे ही अत्यावश्यक बाब आहे. दुसऱ्या शब्दांत, याचा अर्थ व्यक्तिगत वैचारिक प्राप्तीपेक्षा समाजाची वैचारिक पातळी उंचावणे याला प्राधान्य देणे आहे, शिवाय यामध्ये कल्पनांच्या वैविध्याचा स्वीकार करून त्याला मान्यता देणेही सूचित होते. एखाद्या समाजात विचारशक्तीसंपन्नता निर्माण होणे म्हणजे, परंपरेने स्वीकारलेल्या मतांची आणि विश्वासांची सत्यता व सामर्थ्य पडताळून पाहून त्यांचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करण्यासाठी विविध वादविवाद व चर्चासत्रे यात स्वेच्छेने सहभागी होणे. पुढे जाऊन याचा असाही अर्थ होतो की चालू परंपरांचे वेळोवेळी मूल्यमापन व पुनर्मुल्यांकन करणे. समाजामध्ये विचारशक्तीसंपन्नता निर्माण होणे याचा अर्थ असाही आहे की सामाजिक बदल हवासा आहे हा विश्वास स्वीकारला पाहिजे आणि मानवी प्रयत्नांनी असा बदल घडवून आणणे शक्य आहे. याचा अर्थ, सामाजिक सांस्कृतिक राजकीय जागृती वाढली पाहिजे. यासाठी प्रत्येकासाठी समाजामध्ये एक सार्वजनिक स्थान निर्माण झाले पाहिजे म्हणजे अंतिमतः प्रत्येक व्यक्ती समाजाची जबाबदार आणि काळजीवाहू नागरीक झाली पाहिजे. सामाजिक कार्यासाठीचे औदार्य हे सुद्धा विचारशक्तीसंपन्नता येण्याच्या प्रक्रियेचा भाग आहे. अशा जागृतीची परिणती, अस्तित्वात असलेल्या व नव्याने स्थापन केलेल्या समित्या व संघटना यांच्यामधून अखेर एका सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीमध्ये आणि त्याला सामर्थ्य प्राप्त करून देण्यामध्ये होते, अशा रीतीने समाजामधून नागर संस्कृती असलेला सुसंस्कृत समाज घडविला जातो. सुसंस्कृत समाजामध्ये सार्वजनिक जीवन अनेकांगांनी बहरते.

एकोणिसाव्या शतकामध्ये मुंबई कशी होती यावर एक दृष्टिक्षेप टाकू या. मुंबईमध्ये एकोणिसाव्या शतकात अनेक नवीन संकल्पनांचा उगम झाला. एशियाटिक सोसायटी, बॉम्बे जिऑग्राफिकल सोसायटी, बॉम्बे ॲन्थ्रोपॉलॉजिकल सोसायटी, ॲग्रि-हॉर्टिकल्चरल सोसायटी, बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी इत्यादी संस्था विज्ञानाचा प्रसार आणि वैज्ञानिक माहितीचे संकलन व तुलनात्मक अभ्यास यांकरता स्थापन झाल्या. यातील बऱ्याचशा जरी ब्रिटिशांनी सुरू केल्या असल्या तरी या शैक्षणिक संस्थांचा परिणाम स्थानिक समाजावर एकामागोमाग एक संस्थेची निर्मिती होण्यामध्ये झाला. ही मंडळे व संस्था समांतरपणे स्थापन झाली व चालू राहिली. अनेक सुधारणा चळवळी सुद्धा सुरू झाल्या होत्या व त्यांचा उपयोग सर्वसाधारणपणे देशभरातील जनतेसाठी व विशेषत्वाने पश्चिम भारतातील लोकांसाठी मार्गदर्शक

दीपस्तंभासारखा झाला. न्याय व समता यांवर आधारित सामाजिक बदल घडवून आणण्याची आशा हे लोक बाळगून होते. अनेक गोष्टी 'पहिल्यांदा येथे' झाल्याचे या शहराने अभिमानाने मिरवले. जातिविरोधातील पहिली चळवळ मुंबईत सुरू झाली. धर्मग्रंथांचा अचूकपणा नाकारलेला प्रथम पाहिला गेला तो मुंबईमध्ये, वसाहतवादातून होणाऱ्या पिळवणुकीविरोधात तक्रारीची पहिली खुली पत्रे प्रथम मुंबईच्या वर्तमानपत्रात प्रकाशित झाली, पहिला विधवा-विवाह मुंबईत झाला, पहिला हिंदू-मुस्लीम विवाह येथे झाला. ही यादी अजून पुढे जाऊ शकते. आर्य समाजाची मुळे दुसऱ्या जागी रुजली तरी त्याची स्थापना येथेच झाली. प्रार्थना समाजाची स्थापना येथेच झाली. त्याचा आदर्श होता, 'मानवतेच्या सेवेतच देवाची भक्ती आहे.' सुरुवातीपासूनच या समाजाने मूर्तिपूजा नाकारली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, ''मूर्तिपूजा हा अयोग्य मार्ग आहे, हा देवाचा अवमान आहे, ती माणसाची अधोगती करून त्याला वाईट मार्गाकडे वळवते.'' जातिपातीची बंधने तोडण्याची सुरुवात येथे झाली होती तिचाही प्रसार या समाजाने केला. ब्रह्मविद्येचा स्वीकार करणारेही बरेचजण येथे होते. अशा रीतीने मुंबईचा समाज उत्साहाने मुसमुसलेला होता आणि त्याला प्रगतिशील म्हणता येईल.

याच समाजाने अलीकडच्या काळात मात्र विवाद्य नसलेल्या मुद्द्यांवरचे युद्धखोर वादविवादच पाहिले. दीपा मेहता यांच्या 'फायर' सिनेमावरचा वादविवाद आठवतो का? दुसरीकडे, सध्या सामाजिक-सांस्कृतिक, साहित्यिक किंवा सामाजिक नीतिमत्तेच्या मुद्द्यांवरील गंभीर चर्चा होताना दिसत नाहीत. काही वर्षांपूर्वी मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी यांचा जन्मशताब्दी सोहळा साजरा करण्यासंबंधीचा प्रश्न विवाद्य मुद्द्यांपैकी एक होता : हा सोहळा हिंदू पंचांगाप्रमाणे तिथीने की ग्रेगरियन (इंग्लिश) कॅलेंडरप्रमाणे तारखेने साजरा करावा. सध्या राज्य सरकार तो एका दिवशी साजरा करते आणि इतर लोक तोच सोहळा वेगळ्या दिवशी साजरा करतात, म्हणजे तोच वार्षिक सोहळा वर्षातून दोन वेळा साजरा होतो. समस्येची ही उकल आहे की निर्णय पुढे ढकलणे आहे? याचे एक साधे उत्तर असे असू शकते की १८१८ साली आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास पेशवाईबरोबर रसातळाला गेला, मराठ्यांनी सत्ता ब्रिटिशांकडे सोपविली, त्याआधीच्या घटना साजऱ्या करण्यासाठी हिंदू पंचांग वापरावयाचे व त्यानंतरच्या घटना साजऱ्या करण्यासाठी ग्रेगरियन कॅलेंडर वापरावयाचे.

दुसरे उदाहरण द्यायचे तर 'जेम्स लेन वाद प्रकरण'म्हणून गाजलेल्या वादात माननीय गृहमंत्री आर आर पाटील आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे दोघेही वादात उतरले आणि त्यांनी विनाकारण टोकाच्या भूमिका घेतल्या.यदुनाथ सरकारांचा उत्तम शिष्य असलेल्या एस एन सेन यांच्यासकट सर्व इतिहासकारांनी शिवाजीच्या पूर्वजांबद्दलचा पोर्तुगीज क्रॉनिकलमधील अस्पष्ट दावा फोल असल्याबद्दल चर्चा केली आहे. परंतु आमचे सरकार अजूनही या छोट्या पुस्तकावरील बंदी योग्य असल्याचे मानते. कोणत्याही लोकशाही पद्धतीमध्ये पुस्तकावर बंदी आणणे हा शेवटचा उपाय असला पाहिजे. अशा रीतीने अविवाद्य किंवा कमी महत्त्वाच्या मुद्द्यांना प्रचंड महत्त्व प्राप्त होत आहे कारण कायमस्वरूपी उपाययोजना करण्यामध्ये सरकार चालढकल करत आहे. असहिष्णुता वाढते आहे, असुरक्षितता वाढते आहे, आणि त्याचबरोबर हिंसाही. इतरही अनेक उदाहरणे आहेत, जेव्हा सलमान रशदी यांच्या पुस्तकावर बंदी आली, एम एफ हुसेन याच्या चित्रकृतीचा विध्वंस केला गेला. एकात्मिक आणि विस्तृत सांस्कृतिक धोरण लिखित

स्वरूपात उपलब्ध असते तर या सर्व प्रश्नांचा परामर्श घेता आला असता.

एकात्मिक आणि विस्तृत सांस्कृतिक धोरणाचा मसुदा तयार करून ते कार्यान्वित करण्याची हीच वेळ आहे. सांस्कृतिक प्रश्नांसंबंधी सर्वांसाठी एक किमान मसुदा ठरविण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना एका ठिकाणी एकत्र आणले पाहिजे. नाहीतर येत्या काही वर्षांत मुंबईमध्ये अजुनही सांस्कृतिक घसरण होताना दिसून येईल. फक्त काही मूलभूत प्रश्नांवर एकमत झाले तरच परिस्थितीत सुधारणा होऊ शकेल. विस्तृत सांस्कृतिक धोरणामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव असावाः भाषा व साहित्यविषयक धोरण, ग्रंथ व सार्वजनिक ग्रंथालयविषयक धोरण, वारशासंबंधीचे धोरण, संस्कृती धोरण, कला सादरीकरणाविषयीचे धोरण आणि असेच आणखी काही. सध्या सरकारी धोरणे नाहीत असा भाग नाही. सरकारच्या प्रत्येक विभागाची काही ना काही धोरणे आहेत परंतु त्यांना दिलेली प्रसिद्धी आणि त्यांची कार्यान्वितता ही त्या त्या मंत्र्याच्या किंवा सचिवाच्या लहरीनुसार असतात आणि त्यांपैकी कोणी बदलले, त्यांची बदली झाली की त्या धोरणाची पिछेहाट होते, कधी ते पूर्ण उलट फिरते तर कधी त्याची दिशा बदलते.

## पुरस्कृत केलेल्या विस्तृत, एकात्मिक सांस्कृतिक धोरणाची काही वैशिष्ट्ये येथे दिली आहेत :

भाषा व साहित्यविषयक धोरण : भाषांनुसार राज्यांची निर्मिती होऊन चार वर्षे झाल्यानंतर आणि केन्द्र सरकारशी शौर्याने लढा दिल्यानंतर आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती मोठ्या धूमधडाक्याने साजरी झाल्यावरही राज्याचे भाषाविषयक धोरण निश्चित झालेले नाही, विशेषतः इंग्रजीच्या संदर्भात आणि गुजराथीसारख्या इतर भाषांच्या संदर्भातही. राज्याची अधिकृत भाषा म्हणून मराठीचे अध्ययन आणि अध्यापन समर्थपणे व्हावे यासाठी मार्ग व साधने सापडलेली नाहीत. उघड आहे की मुंबईचे बहुजिनसी स्वरूप हा मोठा अडथळा आहे. राज्यभाषा मराठी, राष्ट्रभाषा हिन्दी आणि जागतिक भाषा इंग्रजी .. हे टाळता येणार नाही. अमराठी नागरिकांना पर्याय द्यायचाच तर त्यांच्या मातृभाषेलाही अग्रक्रम द्यावा लागेल. म्हणजे मुंबईमध्ये चार-भाषांचे सूत्र कार्यान्वित करावे लागेल. एक मंत्री एका दिशेने विचार करेल, दुसरा दुसऱ्या टोकाची भूमिका घेईल. आपण एकदाच कायमचे राज्याचे भाषा विषयक धोरण ठरवायला नको का? हे व्यक्तिगत मंत्री किंवा सचिव यांच्यावर का सोपवायचे? बडे वाद बाजूला ठेवले तरी मराठी तसेच इंग्रजी या भाषांचे अध्ययन-अध्यापन सुधारण्यासाठीही सरकारने फारसे काही केलेले नाही.

परदेशी पाहुण्यांनी भेट दिल्यावर आपले मंत्रिमहोदय 'मराठी-इंग्रजी'मध्ये का बोलतात? इंग्रजीचे थातुरमातुर ज्ञान असले तरी ते मराठीमध्ये का बोलू शकत नाहीत? तसे ते बोलले तर इतरांसमोर ते उदाहरण ठेवू शकतील. दुभाष्यांच्या जागा निर्माण करून रोजगारात वाढ करू शकतील आणि मातृभाषेबद्दलचा आपला अभिमान दाखवून देऊ शकतील.

ऑल इंडिया रेडिओ, दूरदर्शन तसेच बँका आणि शासकीय कार्यालये येथे जर हिन्दी अधिकारी नेमले जाऊ शकतात, तर मराठी अधिकारी का नेमले जाऊ नयेत? आश्चर्याची गोष्ट अशी की सर्वसामान्यांना शासकीय मराठी समजतच नाही. सद्यस्थितीत मराठीमध्ये तीन प्रकारचे व्याकरणाचे नियम चालू असल्यामुळे तिच्या व्याकरणात गोंधळ

माजला आहे. प्रमाण मराठी नाही. पूर्वीच्या प्रमाण मराठीचा वापर उच्च जातियांकडून होत असल्याने आणि ते एकूण मराठी भाषकांच्या केवळ साडेतीन टक्के असल्यामुळे, या मराठीला आव्हान दिले गेले. भाषा विषयक धोरण आणखी एका गोष्टीसाठी खूप महत्त्वाचे वाटते जेव्हा देवनागरी लिपीसाठी अनेक वेगळे कळफलक (की-बोर्ड) दिसून येतात. सरकारने पुढे येऊन एका प्रमाण देवनागरी कळफलकाला अधिकृत मान्यता द्यायला नको का?

ग्रंथ आणि ग्रंथालयविषयक धोरण : युनेस्कोच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ज्ञानावर कर असता कामा नये. यावरून हे स्पष्ट होते की पुस्तकांवर कोणत्याही प्रकारचा कर असता कामा नये, अगदी ऑक्ट्रॉय (जकात कर) सुद्धा, जो नगरपालिकेच्या अखत्यारीत असतो. ठाणे नगरपालिकेने पुस्तकांवर ऑक्ट्रॉय लावला आहे, कोल्हापूर नगरपालिकेनेही तेच केले आहे. कितीही अल्पस्वल्प असले तरी, पुस्तकांवर कर लावणे हे उत्पन्नाचे साधन मानले गेले. ही गोष्ट मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या निदर्शनास आणली तेव्हा त्यांनी ताबडतोब पुस्तकांवरचा ऑक्ट्रॉय रद्द केला. या आदेशामुळे फारसे समाधानी नसलेल्या नोकरशाहीने एक सरकारी ठराव करून जाहीर केले, ''अत्यावश्यक पुस्तकांवर ऑक्ट्रॉय धरून कोणताही कर नाही.'' (शब्दावरचा जोर माझा) यामुळे गोंधळ वाढला कारण 'अत्यावश्यक पुस्तके' वेगवेगळ्या लोकांच्या दृष्टीने वेगवेगळी असू शकतात. परत एकदा ही बाब सरकारच्या निदर्शनास आणल्यावर, या आदेशात दुरूस्ती करून आदेश निघाला, 'कोणत्याही भाषेतील आणि कोणत्याही विषयावरील कोणत्याही पुस्तकांवर कोणत्याही प्रकारचा कर नाही.' एवढ्या अवाढव्य शहरामध्ये एवढ्या असंख्य भाषा असताना पुस्तकांसाठी एक समान धोरण असू नये? राजीव गांधी पंतप्रधान असताना या दिशेने एकदा प्रयत्न केला गेला होता. राष्ट्रीय ग्रंथविषयक धोरणाचे काय झाले असेल सहज समजण्यासारखे आहे.

प्राचीन ग्रंथ : दुर्मीळ आणि प्राचीन ग्रंथांच्याबाबतीत तर अधिकृत धोरणाचा पूर्ण अभाव असल्याचे दिसून येते. दुर्मीळ आणि प्राचीन ग्रंथसंग्रहाबाबत, मग तो खाजगी असो वा संस्थात्मक, एक धोरण आखण्याची आवश्यकता आहे याची राज्य सरकारला जाणीव नाही. राष्ट्रीय ज्ञानसंपदा मंडळाच्या ग्रंथालयांवरील कार्यकारी गटाने शिफारस केली आहे की खाजगी ग्रंथसंग्रहासाठी एक राष्ट्रीय समिती स्थापन करावी. आपल्या शहरामध्ये अत्यंत दुर्मीळ साहित्याचा साठा असलेली खूप जुनी ग्रंथालये आहेत. शतसांवत्सरीक सोहळे किंवा त्याहीपुढे जाऊन सव्वाशे ते दीडशे वर्षे पूर्ण केलेल्या ग्रंथालयांची संख्या मोठी आहे. कोणे एके काळी या शहराला येथील दुर्मीळ ग्रंथ विक्रेत्यांचा अभिमान होता. आज दुर्मीळ ग्रंथ विक्रेते ही बाब इतिहासजमा झाली आहे. जुन्या महाविद्यालयांनी जसे, सरकारी एलफिन्स्टन महाविद्यालय (स्था. १८२४) आणि फ्री चर्च सोसायटी ऑफ स्कॉटलंड यांनी चालविलेले (स्था. १८२५) अनेक दुर्मीळ ग्रंथ टाकून दिले आहेत. त्यांच्या प्राचार्यांच्या किंवा ग्रंथपालांच्या बिकट परीस्थीतीचा अंदाज येऊ शकतो की नवीन पुस्तकांसाठी त्यांना जागा तयार करावी लागते, परंतु दुर्मीळ ग्रंथ टाकून देण्याच्या त्यांच्या पद्धतीला माफी नाही.

काढून टाकलेल्या संग्रहासाठी, राज्य सरकारने एक भांडार उघडण्याचा विचार करायला हवा होता. दुर्मीळ ग्रंथांच्या खरेदी विक्रीवर विधिवत स्थापना केलेल्या एका समितीने देखरेख करायला हवी जसे टपाल तिकिटांच्या संग्रहाबाबत करण्यात आले. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासाठी हे योग्य पाऊल ठरले असते. परंतु अशा काही निर्बंधांच्या अभावामुळे, दुर्मीळ ग्रंथ देशाबाहेर गेले आणि महाराष्ट्राच्या या

ज्ञानी प्रदेशातील कोणीही त्यावर आक्षेप घेतला नाही. आता परिस्थिती इतकी धोकादायक आहे की नजिकच्या भविष्यकाळात कोणा संशोधकाला आतापर्यंत मुंबई इलाखा म्हणून ओळखला जाणाऱ्या प्रदेशाशी संबंधित विषयावर संशोधन करावयाचे असेल तर त्यांना सात देशांना भेट द्यावी लागेल. हे सात देश, युके, युएसए, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटली आणि ऑस्ट्रेलिया ठराविक कालावधीने ग्रंथ घेऊन जात असतात. प्रगत देशांतील शहरांमध्ये सरकार व सरकारने उत्तेजन दिलेली औद्योगिक मंडळे ही ग्रंथालये, वस्तुसंग्रहालय व प्राचीन वारसा असलेल्या इमारती यांवर खूप खर्च करत असतात. वस्तुतः, एखाद्या देशातील दुर्मीळ ग्रंथसंग्रह हे त्याच्या सांस्कृतिक श्रीमंतीचे निदर्शक असतात व व्यासंगी तसेच सामान्यजन यांच्यासाठी ते जतन करणे ही राज्य सरकारच्या प्रगतीची कामना म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. पश्चिम भारतातील १९व्या शतकाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनाच कल्पना आहे की या कालखंडासंबंधीचे ग्रंथ प्राप्त करणे केवढे अवघड आहे. परिणामतः पश्चिम भारतावरील संशोधकांमध्ये परिपूर्णतेचा अभाव आहे. इंग्रजीमध्ये लिहिणारे मराठी आणि गुजराथी ग्रंथांचा वापर क्वचित करतात आणि मराठी आणि गुजराथीमधून लिहिणाऱ्यांना इंग्रजी भाषेतील ग्रंथ परवडत नाहीत. इंग्रजी भाषेतील ग्रंथांना परदेशी विद्वानांकडून मागणी असल्याने ते महाग झाले आहेत. सांप्रदायिक स्वरूपाचे काही संशोधन दृष्टिपथात आहे. राज्य सरकारने वेळीच पावले उचलून दुर्मीळ ग्रंथांचा देशाबाहेर जाणारा ओघ थांबवला असता तर ही परिस्थिती टाळता आली असती.

सर्व महाराष्ट्रभरात, शंभरहून अधिक किंवा सव्वाशे ते दीडशे वर्षे पूर्ण केलेली १२५हून अधिक ग्रंथालये आहेत.त्यातील प्रत्येकामध्ये काही दुर्मीळ ग्रंथ आहेत. या ग्रंथालयांमध्ये असणाऱ्या दुर्मीळ ग्रंथांची एक पूर्ण सूची तयार करून घेणे आणि ती संशोधकांना उपलब्ध करून देणे हे सार्वजनिक ग्रंथालयांच्या संचालकांसाठी अवघड आहे का? या संशोधकांच्या हाती यामुळे एक अत्यंत उपयुक्त साधन मिळेल. ठावठिकाणा माहीत नसलेला दुर्मीळ ग्रंथ हा अज्ञात किंवा हरवलेल्या ग्रंथासारखाच असतो.

महाराष्ट्रातील पाठोपाठच्या सरकारांनी केलेल्या विचारानुसार, मानधनाच्या अभावी, लेखक व कलाकार यांना आश्रय देण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु, केवळ पुरस्कार आणि अनुदाने हेच मार्ग, ते सहज सोपे असले तरी, त्यांना प्रोत्साहन देण्याचे मार्ग नव्हेत. राज्याचे ग्रंथविषयक धोरण साहित्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याएवढे कल्पक असायला हवे. शासनाच्या एककेन्द्री ग्रंथखरेदीमुळे अनेक प्रकारच्या भ्रष्टाचाराला जन्म दिला आहे. सरकार आता टीकेबाबत असंवेदनशील झाले आहे आणि कसेतरी करून भ्रष्टाचाऱ्यांना पाठी घालणे जमवू लागले आहे. एखाद्या कल्पक मंत्र्याच्या किंवा नोकरशहाच्या मनात, प्रत्येक किलोमीटर अंतरावर एक पुस्तकांचे दुकान उघडण्यासाठी कायदेशीर तरतूद करण्याचा विचार का आला नाही?

नवीन मराठी पुस्तकाची पहिली प्रत हजाराहून अधिक प्रतींची क्वचित असते. बऱ्याच वेळा तर ती फक्त पाचशे प्रतींचीच असते आणि त्याचे सर्वात मोठे गिऱ्हाईक सरकार असते. एक कोटीच्यावर लोकसंख्या असलेल्या आणि वाढता साक्षरता दर असलेल्या प्रगत राज्याची ही कथा. गंभीर विषयांवरील इंग्रजी पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशनगृहांच्या एका वेळच्या छपाईच्या प्रतींची संख्याही तीनशे एवढी खाली आलेली आहे.

आज मुंबईमध्ये 'महत्त्वपूर्ण' सर्जनशील साहित्यकृतींसाठी साहित्यिक पुरस्कार सहज

उपलब्ध आहेत परंतु वैचारिक मागोव्यासाठी मोठा पुरस्कार मात्र नाही. लेखक आणि कलाकारांना सहज अर्ज करून पुरस्कार मिळत असतील तर प्रगत शासनासाठी ही चांगली गोष्ट आहे का? कोणत्याही क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार हा बहुमान असतो आणि हा बहुमान मानानेच मिळायला हवा, त्याबद्दल सन्मानाची आणि आदराची भावना वाटायला हवी. लेखकांनी आणि कलाकारांनी पुरस्कारासाठी विचारात घेतले जावे म्हणून अर्ज पाठवावेत अशी जर सरकारची इच्छा असेल तर इतर साहित्यिक व दुसऱ्या संस्थाही त्याच पावलावर पाऊल टाकून लेखकांनी अर्ज करावे त्यासोबत पुस्तकाच्या दोन प्रती जोडाव्या अशी मागणी करत आहेत. आत्मसन्मान शाबूत असलेला कोणताही लेखक अर्ज करण्याइतका खाली वाकेल आणि नंतर पुरस्कारप्राप्तीसाठी समितीसदस्यांकडे पाठपुरावा करेल?

आजकाल, पुरस्कार हे बक्षिसांसारखे झाले आहेत. सत्ता टिकवून ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांना केलेल्या मदतीची ती भरपाई असते. सरकारातील उच्चपदस्थ व सत्ताधारी यांच्याशी टिकवून ठेवलेल्या स्नेहसंबंधांचे ते बक्षिस आहे. निश्चितच ते नेहमीच, कदाचित अगदी अनादिकालापासून तसेच असतील. मात्र काही पुरस्कार योग्यतेनुसार दिले गेल्यामुळे थोडी तरी विश्वासार्हता राखली जाते.

आता अशी वेळ आली आहे की या पुरस्कारांची अधिकृत नोंद व्हायला हवी. कधी कधी असेही झालेले आहे की एखादा नवीन पुरस्कार एखाद्या मित्राला दिला जातो आणि तीच त्या पुरस्काराबद्दल ऐकण्याची पहिली आणि शेवटची वेळ असते. देशातील एखाद्या सुपुत्राचे नाव पुरस्काराला दिले जाते परंतु त्यासाठी आर्थिक तरतूद मात्र केली जात नाही आणि म्हणून तो पुरस्कार बंद होतो. पुरस्कार एकदा अधिकृत रीत्या सुरू झाल्यावर तो किमान दहा वर्षे चालू राहिला पाहिजे. दुसरी अट अशी पाळली पाहिजे की कोणत्याही संस्थेला पुरस्काराच्या नावात 'महाराष्ट्र' हा शब्द घालायला परवानगी देता कामा नये. उदाहरणार्थ, महाराष्ट्र रत्न किंवा महाराष्ट्र वैभव किंवा महाराष्ट्र गौरव, तो राज्य सरकारचाच हक्क असला पाहिजे.

इन्स्टिट्यूशन फॉर साऊथ एशियन स्टडीज, इन्स्टिट्यूशन फॉर कल्चरल स्टडीज यांसारखी प्रगत अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण अशी संस्था गेल्या पन्नास वर्षांत मुंबईत उभारली गेलेली नाही. विचार-मंथन केन्द्रे तेथे नाहीत. सरकारलाही त्यांच्या सेवेची गरज नाही.

वारशासंबंधीचे धोरण (जपण्याचा व दर्शनीय इतिहास): वस्तूसंग्रहालयांची दुरवस्था अनेक प्रकारचे दारीद्र्य दर्शविते, यामध्ये राज्य शासनाच्या कल्पनाविष्काराचाही समावेश आहे. पहिली गोष्ट म्हणजे सरकार आणि सगळे लोक यांपैकी कोणाला वस्तूसंग्रहालयांचा मुलांच्या मनावर काय परिणाम होतो याची जाणीव नाही. ती तशी असली तरी इतिहास ग्रहणाच्या अनौपचारिक पद्धतींवर खर्च करण्याची त्यांची तयारी नाही. राज्यामध्ये अनेक वस्तूसंग्रहालये नाहीत कारण त्यांच्या निर्मितीला प्रोत्साहन दिलेले नाही. पारंपरिक, सर्व हेतू साध्य करणारी तसेच पूर्वजांचा वारसा जतन करण्यासाठी आवश्यक अशी कल्पक वस्तूसंग्रहालये निर्माण करण्यासाठी किती पैसे व श्रम लागतात, भविष्यकालीन पिढ्यांसाठी तसेच परदेशी पाहुण्यांसाठी आपल्या इतिहासाचे दर्शन घडविण्यासाठी इतर प्रगत देश किती खर्च करतात हे इतर प्रगत देशांकडून शिकून घेण्याला आपण नकार दिला आहे. प्रत्येक वेळी पुढे केलेले कारण असते निधीची कमतरता; परंतु वस्तुस्थिती ही आहे की केवळ निधीची कमतरता नसते तर बदल घडवून आणण्याची इच्छा नसते. 'इच्छा

तेथे मार्ग' ही जुनी, प्रसिद्ध म्हण आपण विसरलो आहोत. अशा प्रयत्नांमध्ये अनेक दानशूर संस्था तसेच औद्योगिक मंडळे यांची चाचपणी करता येईल.महाराष्ट्र राज्य पुराभिलेख संस्था, देशातील आतापर्यंतची सर्वात श्रीमंत संस्था, आज दुर्लक्षित आहे. तिच्या संग्रही असलेले ऐतिहासिक दस्तावेज आज तुकडे होऊन पडताहेत, टिकवून ठेवण्याच्या, साठवून ठेवण्याच्या आधुनिक पद्धतींच्या प्रतिक्षेत आहेत. हे पुराभिलेख जेथे साठविलेले आहेत ती इमारत खरोखर महाविद्यालयासाठी आहे की राज्य पुराभिलेखांसाठी हे शासनाला ठरवता येत नाही. पुराभिलेख दस्तऐवज ठेवण्यासाठी एक प्रचंड, नवी वास्तू शहराच्या उपनगरात उभारण्याच्या योजनेला अधिकृत संमती मिळालेली आहे परंतु त्या दिशेने पुढे काही प्रगती झालेली नाही.

कला सादरीकरणविषयक धोरण : व्याख्या आवश्यक असतातः अश्लीलता, ग्राम्यता, आधुनिकता, इत्यादी. अलीकडच्या अश्लील साहित्य जप्त करण्याच्या एका खटल्यामध्ये, मुंबई उच्च न्यायालयाच्या एका न्यायाधिशांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्याला 'अश्लीलते'ची व्याख्या करण्यास सांगितले तेव्हा ते गोंधळले कारण अशा प्रकारचा प्रश्न त्यांच्यासमोर कधी आलाच नव्हता. सांगितले गेले त्यानुसार, त्यांपैकी एका न्यायाधिशांनी टोमणा मारला की नग्नता आणि अश्लीलता यामधे फरक केला गेला नाही आणि कला आणि कलाहीनता यात फरक केला गेला नाही तर खजुराहोची प्रसिद्ध मंदिरे झाकून ठेवावी लागतील. नग्नता ही अश्लीलता आहे असे धरून चालण्याची गरज नाही. महाराष्ट्र राज्याचा पोलीस विभाग आधुनिक काळातील बदलती मूल्ये हाताळण्यास पुरेसा तयार नसल्यामुळे आधुनिक काळाला योग्य असे बदलते वातावरण आणि बदलती मूल्ये समजून घेण्यात त्याने पुन्हा पुन्हा वाईट रीत्या असमर्थता दर्शविली आहे. काही सामाजिक मूल्ये शाश्वत असतात, ती बदलत नाहीत, परंतु काही अशी असतात जी बदलत्या जीवनपद्धती व जीवनविणीनुसार निश्चितपणे बदलतात. म्हणूनच, समाजातील विविध गटांतील सुबुद्ध सदस्यांची विचारपूर्वक निवड करून त्यांनी गुन्हेगारी कायद्याच्या उल्लंघनाबाबतच्या तरतुदींवर चर्चा करून, पुढाकार घेऊन त्या तरतुदींची पुनर्व्याख्या केली पाहिजे. सुस्पष्ट व्याख्या व धोरण ठरवून कायद्याचा अर्थ लावणाऱ्या व तो अंमलात आणणाऱ्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी पुढे येण्याची तसदी राज्य सरकारने कधी घेतली नाही. ग्राम्यता, अश्लीलता या संकल्पनांची व्याख्या करणे कठीण असते पण अशक्य नसते. इतर देशांनी अशा अनेक व्याख्यांचा स्वीकार केला आहे आणि संदर्भासाठी त्या उपलब्ध आहेत.

कला सादरीकरणासाठी मान्यता मंडळे (सेन्सॉर बोर्ड) असावी की असू नयेत यावर आपण सातत्याने विचार करत आलो आहोत. सांस्कृतिक वैविध्य असलेल्या आणि भिन्न जाति असलेल्या समाजामध्ये ही मंडळे बरखास्त करणे कोणत्याच शासनाला परवडणारे नाही कारण त्यामध्ये वाद उफाळून येण्याची भीती आहे व त्यातून सामाजिक ताणतणाव निर्माण होऊन सामाजिक एकोप्याला धोका पोहोचेल याची आपल्याला पूर्ण कल्पना आहे. त्यामध्ये उच्चवर्णीयांनी दलितांवर अधिकार गाजवणे चालू ठेवण्याची भीतीही आहे. सेन्सॉर बोर्ड असावी की नसावी या सततच्या वादामध्ये एक मुद्दा नजरेआड होतो तो हा की सरकारने सेन्सॉर बोर्डाचे सदस्य समाजातील खरोखरीच्या वेगवेगळ्या गटांना प्रतिनिधीत्व करतील असे निवडले पाहिजेत. ते खरेच सुबुद्ध असावेत केवळ सत्तेवरील सरकारच्या जवळीकीतले असू नयेत.